## 6. नैतिककथा व त्यातील नीतिमूल्यांची चिकित्सा.

मानवी मनावर नैतिक मूल्ये ठसविण्याचे एक महत्वाचे कार्य पुराणकथा करते. सदाचरणाचा शुद्ध आचरणाचा धडा ती देते. पाप-पुण्य, चांगले-वाईट, सत्-असत् इ. अनेक संकल्पना ती स्पष्ट करते. पुराणकथांतील अनेक घटनांना नैतिक आदर्श व मार्गदर्शक तत्व या दृष्टींनी मूल्य असते. नराचा नारायण होण्यासाठी नरातील दुर्गुण दूर व्हावयास हवेत व नारायणातील सद्‌गुण तेथे प्रकाशणे आवश्यक आहे. तेव्हा कोणते दुर्गुण टाकावेत व कोणते सद्‌गुण अंगीकारावेत याचे मार्गदर्शन काही पुराणकथा करतात. या कथांद्वारे मिळणा-या संदेशांमुळे स्वैराचाराला मर्यादा पडू शकतात. अशा नैतिक मूल्ये सांगणा-या काही कथांची चिकित्सा येथे करणार आहे.

**दानमहात्म्य** :

एकदा देव, मनुष्य व असुर हे ब्रह्मचर्याश्रम संपल्यानंतर प्रजापतीकडे गेले. आपल्याला उपदेश करण्याची विनंती त्यांनी प्रजापतीला केली. तेव्हा प्रजापतीने मेघगर्जनेतून दैवी वाणीने त्या तिघांनाही 'द' या अक्षराचा उपदेश केला. प्रजापतीने तिघांनाही एकाच अक्षराचा उपदेश केला परंतु तिघांनीही त्याचे भिन्न अर्थ घेतले. देवांनी 'द' या अक्षराचा अर्थ 'इंद्रियदमन' असा घेतला. मनुष्यानी 'दान करा' असा घेतला आणि असुरांनी त्याचा अर्थ 'दया करा' असा घेतला. (बृहदारण्यक 5.2) [1]

या छोटयाशा कथेत दमन, दान व दया या लोकव्यवहाराला पोषक व आत्मकल्याणसाधक नीतितत्वांचा पुरस्कार आहे.

प्रजापतीने केलेला हा उपदेश म्हणजे आपल्या शिष्यांचे स्वभाव ओळखून त्यानुसार केलेला

हा उपदेश होय. व शिष्यांनीही गुरूपदेशाचा योग्य अर्थ जाणून आपल्या स्वभावधर्मानुसार त्या उपदेशाचा मतितार्थ स्वीकारला.

देव हे विलासी व चैनी, सर्व सुखोपभोगांचा आनंद लुटण्यात जीवन व्यतीत करणारे म्हणून त्यांना 'इंद्रियदमन करा' असा उपदेश केला. अत्यंत विलासातून नाशाकडे जाण्याचा धोका म्हणून इंद्रियसंयम हवा. इंद्रियांना ताब्यात ठेवणे व तेही सर्व सुखे समोर असताना शक्य झाले तरच तो जितेंद्रिय समजावा. व हि जितेंद्रियता आज माणसांनाही आवश्यक आहे. आत्यंतिक भोगामुळे स्वतःचा व समाजाचाही नाश होतो. म्हणून इंद्रियदमन करणे हे समाजाच्या दृष्टीनेही पोषक असे नीतितत्व आहे.

माणसांना 'दान करा', असा उपदेश केला. स्वार्थी व साठा करण्याची प्रवृत्ती असलेल्या माणसांना दानाचे माहात्म्य सांगितले खरे सुख हे घेण्यात, मिळवण्यात, जमा करण्यात नसते तर त्यागात असते. हे माणसांना सांगितले आहे.

तर क्रूर व दुष्ट असूरप्रवृत्तींच्या राक्षसांना 'दया करा ' अस उपदेश केला आहे. दुस-यांना त्रास देण्यात, मारण्यात सुख नाही, पराक्रम नाही तर दयेने दुस-यांना जिंकावयास हवे. दया, क्षमा इ. गुणांमुळे समाजातील अराजकता नाहीशी होते व शांती प्रस्थापित होते. अशा शांततामय समाजाचा उत्कर्ष होतो. म्हणून राक्षसांनी क्रोधाचा त्याग करुन दया अंगी बाणवावी असा उपदेश राक्षसांना केला.

अशाप्रकारे इंद्रियनिग्रह, दान व दया या स्वोन्नती साधणा-या व समाजाला पोषक अशा नीतितत्वांचा या कथेने पुरस्कार केला आहे.

चारित्र्याचे महत्व सांगणारी महाभारतात आलेली ही कथा घेऊ.

**प्रल्हादकथा** :

एकेदिवशी बृहस्पतीच्या प्रेरणेने इंद्र विप्रवेशात प्रल्हादाकडे गेला त्याने शीलाचे माहात्म्य प्रल्हादाला विचारले. प्रल्हादाने त्याला शीलविषयक सर्व माहिती सांगितली व त्याच्या विनम्र वर्तनाने संतुष्ट होऊन म्हटले, " हे देवेंद्रा, तुला हवा तो वर मजकडून मागून घे. " इंद्र म्हणाला, " दैत्यराजा, मला तुझे शील दे " प्रल्हादाने 'तथास्तु' म्हटले. इंद्र कृतकार्य होऊन स्वर्गाला परत गेला.

त्याच रात्री प्रल्हाद झोपला असता एक परम तेजस्वी आकृती प्रगट झाली. ' तू कोण आहेस ?' असे प्रल्हादाने त्या आकृतीला विचारले. ती आकृती म्हणाली, " मी शील आहे. तू आज इंद्राला शील दान केलेस म्हणून मी तुझ्या शरीरातून निघून इंद्राच्या शरीरात प्रवेश करायला निघून जात आहे." असे बोलून शील निघून गेले. त्याच्यापाठोपाठ धर्म, सत्य, सुरुची, शक्ती व श्री ही तत्वेही प्रल्हादाच्या शरीरातून निघून गेली त्या सर्वांनी प्रल्हादाला सांगितले की, 'जिथे शील असेल तिथेच आमचे वास्तव्य असते. शील नसेल तिथे आम्ही राहू शकत नाही. " 2

शील, चारित्र्य हे एक जीवनमूल्य आहे. या जीवनमूल्याचे दान इंद्राने प्रल्हादाकडे मागितले. शीलाचे दान मागण्यात इंद्राचा नेमका उद्देश काय होता हे समजत नाही. कदाचित प्रल्हाद हा दैत्यराज परंतु आपल्या सद्गुणांनी तो देवांनाही वरचढ ठरावा. अशी परिस्थिती उद्भवली असावी आणि त्यामुळे स्वतःचे स्थान टिकविण्यासाठीही देवांसाठी देवांमार्फत इंद्राने ही मागणी केली असावी. प्रल्हाद हा जरी सद्गुणी असला तरीही तो एक असुर होता, दैत्य होता. त्यामुळे त्याच्याकडून पुढे मागे देवांना नक्कीच धोका होता अशी सार्थ भीतीही त्यांना वाटत असावी. वाममार्गाने, दुष्टपणाने सत्ता मिळविलेल्या सत्ताधीशा पेक्षाही सद्गुणांनी मंडित माणसाची समाजावर, जनमान्सावर अधिक सत्ता चालते. म्हणूनही सत्शील अशा प्रल्हादाकडून त्याच्या शीलाचीच मागणी येथे करण्यात आली. व दैत्यराज प्रल्हादानेही ती मागणी मान्य केली.

प्रल्हादाने स्वशीलाचे दान करताच शीलासमवेत धर्म, सत्य, सुरुची, शक्ती व श्री इ. तत्वेही त्याच्यापासून निघून गेली जिथे शील असेल तेथेच ही सत् तत्वे राहतात. म्हणून शीलाचा त्याग म्हणजेच या सर्व सत्तत्वांचा त्याग होय.

आता येथे इंद्राची ही शीलाची मागणीच व प्रल्हादाकडून त्या मागणीची परिपूर्ती हे दोन्हीही अवास्तव वाटते. परंतु ही कथा जरी अतिरंजीत वाटली तरी तिने शीलाचे कथन केलेले माहात्म्य हे सत्य आहे. शील हे एक जीवनमूल्य आहे. शील असेल तर सर्व काही आहे व ते नसल्यास जीवन म्हणजे केवळ देहधारण होय. 'शीलं परं भूषणम् ।' हा सिद्धांत मनावर बिंबविण्यासाठीच महाभारतात ही कथा सांगितलेली आहे. आजही चारित्र्यसंपन्न माणसाचा समाजात प्रभाव नक्कीच पडतो. त्याच्याविषयी लोकांना

आदर, प्रेम असते हे वास्तव आहे. म्हणून चारित्र्यसंपन्नतेचा सिद्धांत सांगणारी ही कथाही जनमानसाची पकड घेते हे निसंदिग्ध होय.

उच्च नैतिकमूल्ये सांगणारी रामायणातील ही एक कथा.

**राम व काल यांची भेट कथा** :

एकदा प्रत्यक्ष काल ऋषीरुपाने रामाच्या भेटीस आला. तो म्हणाला, " रामा, मी तुला एक संदेश घेऊन आलो आहे. मात्र तो मी तुला एकांतात सांगेन तो जर कुणी ऐकला किंवा आपणा दोघांना कुणी एकांतात पाहिले तर तू त्याचा तात्काळ वध करावास. रामाने ते मान्य केले. लक्ष्मणाला दारावर उभे करुन राम एकांतात गेला. त्यावेळी काल रामाला म्हणाला, "तुझी या जन्माची आयुर्मर्यादा संपली असून तू आता त्वरित देवलोकी निघून ये असा तुला विधात्याचा निरोप आहे. त्यावर राम म्हणाला, मी सिद्ध आहे. " मग ते दोघेही आणखी काही बोलत बसले. एवढयात दुर्वास तेथे आले आणि लक्ष्मणाला म्हणाले, " मला आत्ताच्या आत्ता रामाची भेट हवी आहे. " लक्ष्मणाने विचार केला की, " हा कोपिष्ट मुनी खवळला तर त्याचे दुष्परिणाम रामाला भोगावे लागतील या भीतीने लक्ष्मणाने एकांत मंदिराचे दार उघडले व दुर्वासांच्या आगमनाची बातमी रामाला सांगितली. मग रामाने दुर्वासांचे स्वागत केले तेव्हा तो रामाला म्हणाला, " मी अनशन व्रत केले असून आज मला त्याचे पारणे करावयाचे आहे. तेव्हा तू माझ्या भोजनाची सिद्धता कर. " रामाने कालाला निरोप दिला आणि दुर्वासालाही भोजन घालून परत पाठवले मग लक्ष्मण पुढे होऊन रामाला म्हणाला, " तू माझा वध करुन तुझी प्रतिज्ञा पार पाड. कारण मी तुमच्या एकांताचा भंग केला आहे. "

रामाला लक्ष्मणाचा वध करवेना. त्याग हा वधाचाच पर्याय होऊ शकतो असे ज्ञान वृद्धांनी सांगितल्यावर रामाने तोच उपाय अवलंबिला. " मी तुझा त्याग करीत आहे " हे वाक्य रामाने उच्चारताच लक्ष्मणाचे डोळे अश्रूंनी भरले. "

लक्ष्मण तेथून निघाला तो शरयू नदीवर गेला. नदीत स्नान करुन व श्वासनिरोध करुन लक्ष्मणाने देहत्याग केला. [3]

या कथेत राम व लक्ष्मण या दोघांनीही उच्च प्रतीचा आदर्श घालून दिलेला आहे.

एकांताचा भंग केल्यास तो करणा-यास देहदंड आहे हे माहीत असूनही लक्ष्मणाने राम व काल यांच्या भेटीत व्यत्यय आणला. त्यासाठी कारणही तेवढेच महत्वपूर्ण होते. दुर्वासांचे म्हणणे मान्य केले नसते तर कोपाग्नीत सर्व अयोध्यावासी , त्याहीपेक्षा प्राणांहून प्रिय अशा रामाची सुद्धा आहुती द्यावी लागली असती. त्यापेक्षा स्वतःच्या एकटयाच्या मृत्यूने या सर्वांना वाचविणे अधिक महत्वाचे म्हणून लक्ष्मणाने रामाच्या एकांत मंदिराचे दार उघडले व दुर्वास व काल निघून जाताच रामाला त्याच्या प्रतिज्ञेची आठवण करुन दिली व ती पार पाडण्यासाठी आग्रह केला, रामाला त्याच्या प्रतिज्ञेची आठवण करुन देणे म्हणजे स्वतःचा प्राण गमावणे हे लक्ष्मणाला माहीत का नव्हते. परंतु रामाला त्या प्रतिज्ञेची आठवण करुन देताना स्वतः तर चूक करावयाची नाही व आपल्या घराण्यातील कोणीही ती करावयाची नाही असा आग्रह येथे दिसतो. सर्व त-हेचे आदर्श घराण्यातील सर्वांनीच जपले पाहिजेत अशी रामासारखीच आग्रही भूमिका लक्ष्मणाची दिसते.

खरे तर लक्ष्मणाच्या हातून चूक घडली हे खरे . पण त्यामागचा कार्यकारण भाव लक्षात घेता त्यामागचा सद्‌हेतू , अंतरीची कळकळ सहज लक्षात येते. हा सद्‌हेतू लक्षात घेताच लक्ष्मणाचा गुन्हा हा मुळीच अक्षम्य नव्हता. परंतु राजानेच जर आपली प्रतिज्ञा पूर्ण केली नाही, आपला भाऊ म्हणून दोषी असूनही त्याला माफ केले तर लोकांच्या मनातून रामराजा उतरेल. व लोकापवाद सहन करावा लागेल आणि मग नागरिकांकडून आपल्यालाही काही आदर्श आचरणाची अपेक्षा करण्यास अधिकारच राहणार नाही असा विचार वा हेतू लक्ष्मणाचा असला पाहिजे. म्हणून लक्ष्मणाचे प्रत्यक्ष बलिदान हे जरी उच्चकोटीचा आदर्श असले तरीही त्याची त्यामागची प्रेरणा, सखोल विचार, हृदयाची उदात्तता ही अधिक विलोभनीय आहेत.

जनहितासाठी स्वतःचे बलिदान करणारा लक्ष्मण आणि स्वप्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठी प्राणांहून प्रिय अशा भावाचाही त्याग करणारा राम आजही आदर्श आहेत. दिव्यत्वाची प्रचीती देणारे व आज समाजाला अंतर्मुख करणारे आहेत.

**अंबरीष कथा :**

नाभागपुत्र अंबरीष भगवद्‌भक्त होता. अंबरीष व त्याच्या पत्नीने श्रीकृष्णाच्या आराधनेसाठी एक वर्षपर्यंत साधनाद्वादशी व्रताचा नियम केला. द्वादशीला पारणाचे वेळीच दुर्वास ऋषी तेथे आले

ते माध्याह्निकासाठी यमुनेवर गेले. द्वादशी एक घटकाच राहिल्यामुळे ब्राह्मणांच्या सल्ल्यानुसार अंबरीषाने थोडेसे पाणी प्राशन केले व मग तो दुर्वासांची प्रतीक्षा करु लागला.

माध्याह्निक आटपून आलेल्या दुर्वासांनी राजाने आपल्याला सोडून पारणा केली, हे ओळखले व रागाने त्यांनी आपल्या जटेतून कृत्या निर्माण केली. हातात खड्ग घेऊन ती अंबरीषाच्या अंगावर धावली. परंतु राजाच्या रक्षणासाठी भगवंताने सुदर्शन चक्र फेकून त्या कृत्येला जाळले व तेच चक्र दुर्वासांच्या मागे लागले. दुर्वास प्राणभयाने ब्रह्मदेव, शंकर यांना शरण गेले. परंतु त्यांनी त्याच्या रक्षणाविषयी असमर्थता प्रकट केली व शेवटी दुर्वास भगवंतालाच शरण गेले. भगवंताने अंबरीषाकडे जाऊन त्याचीच माफी मागावयास सांगितले.

लज्जित दुर्वास अंबरीषाकडे आले व त्यांनी त्याची प्रार्थना केली. तेव्हा अंबरीषाने मोठया मनाने दुर्वासांना क्षमा केली व सुदर्शन चक्राची स्तुती करुन त्याला ही शांत केले.

या सर्व घटना होईपर्यंत एक वर्षाचा कालावधी गेला तोपर्यंत अंबरीष केवळ पाण्यावरच होता.

येथे दुर्वासांसारख्या तपस्वी, परंतु क्रोधी मुनींना योग्य तीच शिक्षा मिळालेली आहे. कारण नसताना सात्विक माणसाला त्रास दिल्यास त्या माणसाचे रक्षण करण्यास स्वतः भगवंत येतो हे ही कथा सांगते. 'देव तारी त्याला कोण मारी ' या म्हणीची प्रचीती ही कथा देते. तसेच दुष्ट माणूस जेव्हा आपली वाईट बुद्धी सज्जनाच्या नाशासाठी वापरतो तेव्हा ती त्याच्याच पाठी लागते हे सत्यही या कथेत प्रतीत होते. आणि म्हणून दुस-याचे वाईट चिंतू नये, दुस-याचे वाईट चिंतिल्यास स्वतःलाच वाईट भोगावे लागते असा संदेश ही कथा देते.

अंबरीष हा एक सत्ताधीश. वास्तविक सुदर्शन मागे लागल्याने पळालेल्या दुर्वासांची केवळ पाणी प्राशन करुन वाट पहात राहण्याचे अंबरीषाला काहीच कारण नव्हते. तसेच काहीही कारण नसताना अंबरीषाला त्रास देण्यासाठी तयार झालेल्या दुर्वासांसाठी वर्षभर प्रतीक्षा करण्याची काहीही आवश्यकता नव्हती. तरीही 'अतिथी देवो भव' या नात्याने आलेला अतिथी न जेवताच गेला याची बोच अंबरीषाला होती आणि म्हणून

त्याने त्याचे प्रायश्चित्त मोठया विशाल अंतःकरणाने घेतले. सत्य न जाणताच दुराग्रही व तापट दुर्वासांनी आपल्याला त्रास दिला त्या दुर्वासांनाही विशाल अंतःकरणाने क्षमा केली. एवढेच नव्हे तर त्यांच्या मागे लागलेल्या सुदर्शनालाही थांबविले व एकप्रकारे त्यांची संकटातून सुटका केली व त्यांना भोजन दिल्यानंतरच स्वतः भोजन घेतले.

अतिथी हा नेहमीच पूज्य असतो. त्याचा योग्य आदर करावा हा गृहस्थधर्मातील प्रमुख आचार, कर्तव्य सांगण्याचे काम ही कथा करते.

**दानमाहात्म्य सांगणारी वृषदर्भराजाची कथा :**

एकदा एका श्येनाने एका कपोतावर झडप घातली, तेव्हा तो कपोत पक्षी आकाशातून जमिनीवर पडत असताना वृषदर्भ राजाच्या आश्रयास गेला. राजाने त्याला आश्रय दिला व अभय ही दिले. कपोताच्या पाठोपाठच श्येनपक्षी आपल्या भक्ष्यासाठी तेथे आला व त्याने राजास आपले भक्ष्य आपल्याला देण्याची विनंती केली. तो कपोत माझं भक्ष्य आहे व मी तृषार्त आहे तेव्हा त्याच्या रक्षणाचा विचार सोडून तू मला माझे भक्ष्य दे. अन्यथा मला त्याच्या वजनाचे तुझे मांस दे." तेव्हा राजाने थोडे थोडे करत आपले संपूर्ण शरीर दिले. हे पाहून इंद्रासहवर्तमान सर्व त्रैलोक्य तेथे आले. देवगंधर्वादिकांनी राजावर सुगंधी, दिव्य पुष्पवृष्टी केली. एवढयात सुवर्ण व रत्नजडित दिव्य विमान तेथे उतरले व राजाला घेऊन स्वर्गात गेले. (म.अनु.32) [5]

या कथेत दानाचे महत्व सांगितले आहे. हिच कथा शिबीराजाच्या बाबतही सांगितलेली आहे. आश्रयासाठी आलेल्याला सर्वतोपरी साहाय्य करावे हे मूल्य ही कथा सांगते.

आश्रयास आलेल्या शरणार्थीचे अभय देऊन रक्षण करावे. श्येनपक्ष्याचे भक्ष्य म्हणजे कपोत म्हणून श्येनाची मागणी ही रास्तच होती. परंतु वृषदर्भराजाने त्याला अभय दिलेले होते म्हणून त्याने त्याचे रक्षण केले. परंतु त्याचवेळी श्येनाने स्वतःची भूक शमविण्याची मागणी केली. तेव्हा राजा या नात्याने त्याने त्याला कपोत सोडून काहीही देण्याची तयारी दर्शविली. तेव्हा श्येनाने त्याला त्याचेच मांस मागितले व राजानेही ते आनंदाने दिले. शेवटी राजाने संपूर्ण शरीरच दान केले. त्यामुळे त्याला चिरंतन स्वर्गवास लाभला.

कपोताचे वजन राजाच्या थोडया वा अधिक मांसाने होईना. राजाच्या संपूर्ण शरीराचे वजन कपोताच्या वजनाएवढे भरले म्हणजे काहीसे अघटितच घडले. तेथेच राजाच्या दानशूरपणाची परीक्षा घेतली गेली. श्येनाच्या रूपाने इंद्र व कपोताच्या रूपाने अग्नी तेथे राजाची परीक्षा पाहण्यासाठी आले. राजा त्या परीक्षेत पूर्णतः यशस्वी झाला. त्यामुळे या कथेत मानवी व अतिमानवी घटकांची मिसळ झालेली आहे.

शरण आलेल्याला सर्वस्वी रक्षण द्यावे आणि असे रक्षण करणा-यास अंती उत्तम गती प्राप्त होते असे ही कथा सांगते. अत्यंत उच्च नैतिक मुल्ये ही कथा सांगते.

**दण्डराजाची कथा** :

इक्ष्वाकुपुत्र दण्ड हा अत्यंत उद्धट, मदांध होता म्हणून त्याच्या पित्याने त्याला दक्षिणेकडील एक भूभाग दिला होता. त्याने तेथे गोदावरीच्या काठी मधुमंत नावाचे नगर आपली राजधानी म्हणून वसविले होते.

त्याने दैत्यगुरू शुक्राचार्यांना आपला गुरू बनविले. त्यांच्या साहाय्याने व आशीर्वादाने दण्डचे राज्य समृद्ध बनले. परंतु त्याचबरोबर राजाची उच्छृंखलताही अधिक वाढली.

एकदा राजा आपल्या सर्थींबरोबर शुक्राचार्यांच्या आश्रमात आला. पण त्यावेळेस शुक्राचार्य आपला शिष्य, वृषपर्वाकडे होते. शुक्राचार्य शिष्यांनी त्याचे स्वागत केले व तो शुक्राचार्यांची कन्या अरजेजवळ बसला. पण तिचे असामान्य लावण्य पाहून राजाच्या मनात अभिलाषा उत्पन्न झाली. व तिने खूप विनवणी करूनही त्याने तिचे सतीत्व हरण केले व तो पळून गेला.

थोडया वेळानंतर वृषपर्वाकडून शुक्राचार्य परत आले. त्यांना अरजाची सर्व कर्मकहाणी समजली व त्यांनी रागाने सात रात्रीच्या आत दण्डचे संपूर्ण राज्य, सेना आगीत भस्मसात होईल असा शाप दिला. शुक्राचार्य शिष्यांनी दण्डराज्यातील सर्व प्रजाजनांना बाहेर जायला सांगितले. पापी दण्ड व त्याचे राज्य शुक्राचार्यांच्या शापानुसार सातव्या रात्री आगीत भस्मसात झाले. तेव्हापासून या भागाला दण्डकारण्य असे म्हणतात. (वामनपुराण अ. 6) हीच कथा वाल्मीकी रामायण उत्तरकांड सर्ग 80 मध्येही आहे.[6]

या कथेत सत्ताधीशांचे मदांध, बेछूट वर्तन आपणास पहावयास मिळते. अरजा विनवणी करीत असतानाही बेफाम, बेछूट दण्ड तिची विनवणी धिक्कारतो. "आपल्या पित्यास तू माझ्याविषयी याचना कर त्याच्या संमतीनेच तू माझे पाणिग्रहण कर", असे अरजेने स्पष्ट सांगितले असताही दण्ड आपल्यावर काबू

ठेऊ शकला नाही. त्याने अरजेवर बलात्कार केला नंतर एखाद्या भ्याडासारखा तो स्वतःच्या नगरीत पळून गेला. अरजेशी अनैतिक वर्तन केल्यानंतर त्याने तिथेच थांबून शुक्राचार्य आल्यानंतर सत्यकथन करून, त्याने शुक्राचार्यांची क्षमा मागून अरजेची जबाबदारी स्वीकारली असती तर ते वर्तन इक्ष्वाकुराजाला शोभून दिसले असते. व कदाचित् शुक्राचार्यांचा इतका कोप सहन करावा लागला नसता.

परंतु दण्ड हा अरजेशी बळजबरी करून पळून गेला. म्हणजेच त्याला स्वतःलाही त्याचे स्वतःचे वर्तन खटकत असावे म्हणून शुक्राचार्यांपासून, आपल्या पुरोहितांपासून तोंड लपविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच तो दण्डास पात्रच आहे. शुक्राचार्यांनी आपल्या शापाने दण्डराजाचे सर्व राज्य आगीत भस्मसात केले. हा शाप दिल्यानंतर शुक्राचार्यशिष्यांनी दण्ड राज्यातील प्रजाजनांना राज्य सोडून जाण्यास सांगितले. व त्यांना त्यासाठी मदत केली. येथे राजाच्या कृत्याचे फळ निरपराधी जनतेला भोगावे लागले पण ते अल्प प्रमाणात. कारण शापाग्नीत त्यांची जीविते व त्यांची संपत्ती तरी वाचली. फक्त त्यांना राज्यत्याग करून नवा आश्रय घ्यावा लागला. त्यामुळे शुक्राचार्य शिष्यांचे व शुक्राचार्यांचे हे वर्तन अत्यंत नैतिक व दयापूर्ण होते हे मान्यच आहे.

परंतु त्याचबरोबर राजाला मिळालेला शाप हाही योग्यच आहे. बलात्कारासारख्या गुन्ह्याला अशी कठोर शिक्षाच योग्य होय. या शिक्षेमुळे पुढील जनतेला धडा दिला जातो. अर्थात येथे असाही मुद्दा उपस्थित होतो की अरजा ही शुक्राचार्यांसारख्या गुरुची कन्या जर नसती, आणि ती जर एक सर्वसामान्य स्त्री असती तर तिचा विनयभंग करणा-याला एवढे कठोर शासन मिळाले असते का? अर्थात खेदाने आपल्याला नकारात्मक उत्तरच देणे भाग पडते. कारण सर्वसामान्य स्त्री एवढया बलाढय शक्तीशी एकटयाने सामर्थ्य देऊ शकेलही परंतु त्यात त्या व्यक्तीची समर्थता, नक्कीच कमी पडेल आणि तिला योग्य न्याय मिळणारही नाही. परंतु येथे एका समर्थ गुरुच्या कन्येवर हा प्रसंग आल्याने राजाचा सर्वनाश झाला. तेव्हा स्त्रीवर अतिप्रसंग करु नये. केल्यास सर्वनाश होतो असा संदेश सांगण्यासाठी ही कथा वामनपुराणात व वाल्मीकी रामायणात आली आहे.

**समारोप:**

या प्रकरणात अत्यंत उच्चकोटीची नीतिमूल्य सांगणा-या कथांचा आढावा घेतलेला आहे. दान, सत्य वचनपूर्ती, अहिंसा इ. मूल्ये सांगणा-या या कथा श्रेष्ठ तर आहेतच परंतु ती मूल्ये जपणारी, त्या मूल्यांसाठी जीव ही टाकणारी राजा अंबरीषासारख्या व्यक्तीही जीव ओवाळून टाकाव्यात अशा आहेत. अशा आदरणीय व्यक्तींपुढे ते आदर्श जपण्यासाठी त्यांचे चाललेले प्रयत्न, त्यासाठी कसलाही त्याग करण्याची वृत्ती हे सर्वच आदर्शाची परिसीमा गाठणारे आहे. आणि म्हणूनच अशा आदर्शापुढे आपोआपच नतमस्तक व्हावयास होते. असे हे आदर्श समाजापुढे उभे करण्यासाठी या कथांच्या कथनाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

1. बृहदारण्यक 5.2
2. महाभारत शांतिपर्व .124
3. भारतीय संस्कृतिकोश . पं.म.जोशी खंड 8
4. भागवत पुराण 9.4.5
5. महाभारत अनुशासनपर्व 32
6. वामनपुराण अ.6


* * *